PREMIUM QUALITY FOOD IN DHULE
* Dosas * Sandwiches * Pav Bhaji * Pulao * Frankie
* Pizza * Fries * Chopsuey / Noodles * Momos
* Soup * Punjabi / Chinese / Continental * Starters
* Sizzler * Tandoor Starters * Chaap * Thali
Main Course * Juices * Falooda / Milkshakes / Dessert
JAIN FOOD AVAILABLE FREE HOME DELIVERY
SPACE FOR KITTY / BIRTHDAY PARTY
B'Live Restaurant
Below Card House, Lane No.5,
Near Sonya Maruti, Dhule
9423928900 / 9307868768
Also available on zomato SWIGGY

आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ७० ■ अंक क्र.२१ ■ शुक्रवार २३ ऑक्टोबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26

उत्कृष्ट क्वालिटी
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करणार

मनोज जरांगेंच्या ऑडिओ क्लिपमध्ये आवाज भाजप प्रवक्त्यांचे : खा. नरेश म्हस्केंचा दावा

पुणे, दि. २२ : मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी जारी केलेल्या ऑडिओ क्लिपवरुन एकच खळबळ उडाली आहे. भाजपकडून पाचशे कोटी रुपये घेऊन खासदार श्रीकांत शिंदेंच्या हस्ते मनोज जरांगेंना पाठवल्याचा उल्लेख या ऑडिओ क्लिपमध्ये आहे. या ऑडिओ क्लिपची पुष्टी अद्याप झालेली नाही. मात्र, मनोज जरांगेंनी भर पत्रकार परिषदेत ही ऑडिओ क्लिप ऐकवून शिवसेना नेते एकनाथ शिंदे आणि भाजपवर हल्लाबोल केला आहे. दुसरीकडे या ऑडिओ क्लिपबाबत भाजपने स्पष्टीकरण द्यावे, असे शिवसेना नेते आणि मंत्री उदय सामंत म्हणाले आहेत. या ऑडिओ क्लिपची सत्यता तपासायला हवी, ही एआय निर्मित क्लिपही असू शकते, असे भाजप प्रवक्ते नवनाथ बन म्हणाले.



या सर्व प्रकारानंतर शिवसेना खासदार नरेश म्हस्के यांनी माध्यमांशी बोलताना गंभीर आरोप केले आहेत. खासदार नरेश म्हस्के म्हणाले, या ऑडिओ क्लिपची सत्यता तपासण्यासाठी ती सायबर सेलकडे पाठवायला हवी. मनोज जरांगेंनी ती क्लिप पोलिसांना, सायबर सेलला द्यावी. जरांगे आणि शिवसेना यांच्यात भांडण लावण्याचे काम कोण करते, ते समोर येईल.

नरेश म्हस्केंनी नावे घेतली

दरम्यान, ऑडिओ क्लिपची सत्यता पडताळण्यासाठी पोलिसांत तक्रार करण्याचे आवाहन शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांनी केले आहे. यासोबतच मनोज जरांगे-पाटील यांनी विनाकारण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करू नये, असा सल्लाही म्हस्के यांनी दिला आहे. इतकेच नाही तर या ऑडिओ क्लिपमधील आवाजावरुन हे आवाज भाजप प्रवक्त्या श्वेता शालिनी, निधी कामदार आणि आमदार अतुल भातखळकर यांचे असल्याचे दिसते. हे आवाज त्यांचेच आहेत का? ही ऑडिओ क्लिप खरी आहे का? हे समोर आले पाहिजे, असे नरेश म्हस्के म्हणाले. इतकेच नाही तर ही ऑडिओ क्लिप खरी असेल तर आमच्या नेत्यांबद्दल जर मित्र पक्षातील नेते अशी वक्तव्ये करत असतील तर वरिष्ठांनी कारवाई करावी असेही म्हस्के म्हणाले. **(पान ४ वर)**

शिंदेंबद्दल निर्माण होणारे प्रश्न मान्य नाही : शेलार



मुंबई : कथित ऑडिओ क्लिपची सखोल चौकशी करण्यात यावी. या सगळ्या प्रकरणात ही कथित ऑडिओ क्लिप बाहेर आली कशी. त्याची सत्यता किती आहे, यात तंत्रज्ञानाचा वापर झालाय का? क्लीप अवैध पद्धतीने केली गेली का? ऑडिओ क्लिप आता का आणली, ती मनोज जरांगे यांच्याकडे का पोहोचवली गेली, यासगळ्याची चौकशी झाली पाहिजे. या सगळ्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत प्रश्न निर्माण करणं योग्य नाही. ऑडिओ क्लिपमधील तथाकथित चर्चेशी आमची असहमती आहे. सखोल चौकशी झाली पाहिजे, अशी आमची भूमिका असल्याचे भाजप नेते आशिष शेलार यांनी म्हटले आहे. **(पान २ वर)**

ओंकार ग्रुपतर्फे कारखान्याच्या गळीत हंगामाचा शुभारंभ ऊस उत्पादकांना सर्वाधिक दर व मोफत साखर वाटप

शहादा, दि.२३(का.प्र.)- तालुक्यातील पुरुषोत्तमनगर येथे ओंकार शुगर अँड अलाईड लिमिटेडच्या (सातपुडा साखर कारखाना) गळीत हंगामाचा बॉयलर अग्नी प्रदीपन, मोळीपूजन व गळीत हंगामाचा दिमाखदार शुभारंभ पार पडला. परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी आणि कामगारांच्या हितासाठी कटिबद्ध राहत गतवर्षीच्या हंगामासाठी प्रतिटन ३०५० रुपये असा जिल्ह्यातील उच्चांकी भाव देण्यात आला असून दिवाळीनिमित्त २५ तारखेपासून सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोफत साखर वाटप सुरू केले जाईल, तसेच यंदाच्या हंगामातही जिल्ह्यात सर्वाधिक दर ओंकार ग्रुपतर्फे देण्यात येणार असल्याचे



प्रतिपादन चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष दीपकभाई पुरुषोत्तम पाटील होते. याप्रसंगी आमदार राजेश पाडवी, माजी जिल्हा परिषद सदस्या जयश्रीताई दीपक पाटील, नगरपरिषदेच्या उपाध्यक्षा माधवीताई मकरंद पाटील, पुरुषोत्तम नगरच्या सरपंच कोकिळाताई अशोक पाटील, ग्रुपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तेजस्विनी बर्गे व परिसरातील सरपंच, उपसरपंच, विविध संस्थांचे पदाधिकारी, शेतकरी आणि कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना चेअरमन बोत्रे पाटील म्हणाले की, गत हंगामात शेतकऱ्यांना २९५० रुपये **(पान ४ वर)**

अनु.जातींच्या उपवर्गीकरणाविरोधात जनआक्रोश महामोर्चा; कार्यकर्त्यांसह महिलांची उपस्थिती

नंदुरबार, दि.२२ (प्रतिनिधी)- अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या धोरणाला विरोध दर्शवण्यासाठी नंदुरबार येथे अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी जनआक्रोश महामोर्चा काढण्यात आला. अनुसूचित जातींचे घटनात्मक हक्क, आरक्षणाचे संरक्षण आणि सामाजिक एकता अबाधित ठेवण्याच्या मागणीसाठी संघर्ष समितीच्या वतीने आयोजित या महामोर्चात माजी खासदार जोगेंद्र कवाडे, खासदार ॲड. गोवाल पाडवी यांच्यासह आंबेडकरी



चळवळीतील विविध मान्यवर आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण केल्यास सामाजिक एकतेवर परिणाम होण्याची शक्यता असून, आरक्षणाच्या समान हक्कांवरही त्याचा परिणाम होऊ शकतो, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. बेरोजगारी, महागाई आणि खासगीकरण यांसारख्या **(पान ४ वर)**

एटीएम कार्ड बदलवून एकाहत्तर हजार लंपास

धुळे, दि.२२- एटीएम कार्ड बदलवून घेत शहरातील निवृत्त शिक्षिकेचे ७१ हजार रुपये परस्पर काढून घेत फसवणूक केली. याप्रकरणी आझादनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पुष्पा गोपालकृष्ण शर्मा (वय ७३, रा. महावीर कॉलनी, साक्री रोड, धुळे) या १९ ते २० ऑक्टोबरला गल्ली क्रमांक सह परिसरात गेल्या होत्या. तेथील एका बँकेच्या एटीएम जवळ अज्ञात व्यक्तीने त्यांच्या नकळत एटीएम कार्ड अदलाबदल करून घेतले. त्यांच्या पेन्शन खात्यातून परस्पर एकुण ७१ हजार रुपये काढून घेत पुष्पा शर्मा यांची फसवणूक केली. याप्रकरणी आझाद नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

मनपा स्थायीत मलनिस्सारण योजना ठेकेदाराच्या कामाचे वाभाडे; मुदतीत काम न केल्यास प्रतिदिन दंडाचा निर्णय

धुळे, दि.२२- अमृत २.० अभियानांतर्गत धुळे शहर मलनिस्सारण योजनेची ठेकेदारावर जबाबदारी सोपविण्यात आली होती. मनपाच्या अटी शर्ती नुसार ठेकेदाराने दि.१४ ऑक्टोबर २०२६ पर्यंत काम पूर्ण करणे अपेक्षित असतांना आता पर्यंत केवळ पंचवीस टक्केच काम झाले. उर्वरीत अद्याप का झाले नाही ? असा सवाल स्थायी समितीच्या सभेत सदस्यांनी उपस्थित केला. कामाचा दर्जा तसेच संथपणा यावरही सदस्य संतप्त झाले.त्यावर उपायुक्त



हेमंत निकम यांनी तक्रारीत तथ्य आढळल्यास ठेकेदाराने मुदतीत काम पूर्ण न केल्यास प्रतिदिन बारा लाख त्रेसष्ट हजार रूपये दंड आकारण्याचा निर्णय स्थायी समितीच्या सभेत घेण्यात आल्या.

भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात घेण्यात आलेल्या स्थायी समितीची सभा लताबाई पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली **(पान ४ वर)**

केबल चोरीचा प्रयत्न आठ जणांविरुद्ध गुन्हा

नंदुरबार, दि.२२ (प्रतिनिधी)- नंदुरबार तालुक्यातील शनिमांडळ शिवारात सुझलॉन कंपनीच्या पवनचक्की टॉवरमधील तांब्याची केबल कापून चोरी करण्याचा प्रयत्न झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी ८ जणांविरुद्ध नंदुरबार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेत कंपनीचे सुमारे २ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना २१ ऑक्टोबर २०२६ रोजी मध्यरात्री सुमारे २ वाजता घडली. शनिमांडळ शिवारातील सुझलॉन कंपनीचा टॉवर क्रमांक ३५४ येथे आरोपींनी **(पान ४ वर)**



मातोश्री पाणंद रस्ते योजनेतून

नवापूर तालुक्यात विकासकामांचा धडाका आ.शिरीषकुमार नाईकांच्या हस्ते शुभारंभ

नवापूर, दि.२२- महाराष्ट्र शासनाच्या मातोश्री पाणंद रस्ते योजनेंतर्गत नवापूर तालुक्यातील जुनी सावरट, गताडी, मासलीपाडा व भरडू येथे विविध पाणंद रस्त्यांच्या कामांचा शुभारंभ आमदार शिरीषकुमार नाईक यांच्या हस्ते श्रीफळ फोडून करण्यात आला. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतापर्यंत जाण्यासाठी चांगले रस्ते उपलब्ध व्हावेत, शेतीमालाची वाहतूक सुलभ व्हावी आणि ग्रामीण विकासाला गती मिळावी, या उद्देशाने या कामांना सुरुवात करण्यात आली.

जुनी सावरट येथे वावडी रस्ता ते हुरजी दावजी यांच्या शेतापर्यंत रस्ता तयार करण्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी तहसीलदार दत्तात्रय जाधव,माजी उपसभापती शिवाजी गावीत,किश गावीत, सरपंच संगीता विलास वसावे, उपसरपंच करिष्मा वळवी, सदस्य यशपाल यशवंत वसावे, विलास करणसिंग वसावे, राहुल सेगा वळवी, सुभाष अरविंद गावीत, ग्रामपंचायत सदस्या लक्ष्मी लीलाधर गावित, पुष्पांजली जितेंद्र गावित, अमिता अमृत वसावे व जयसू जितेश गावित यांच्यासह ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते. त्यानंतर गताडी ग्रामपंचायत हळदानी येथे काळ्या रेवजी गावित यांच्या शेतापासून आहंज्या गावित यांच्या शेतापर्यंत, तसेच मासलीपाडा येथे विनायक मनसा गावित यांच्या शेतापासून दिवानजी गावित यांच्या शेतापर्यंत रस्त्याच्या कामांचा शुभारंभ करण्यात आला. भरडू येथेही पाणंद रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली. सकाळी वाजेपासून विविध ठिकाणी कामांना प्रारंभ करण्यात आला. यावेळी सरपंच छाया गावित, उपसरपंच सविता गावित, ग्रामपंचायत अधिकारी दिलीप खोबरागडे, अभियंता दीपक कापसे, अभियंता पवन नाईक, सरपंच प्रियंका वळवी, उपसरपंच किशोर वसावे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते. आमदार शिरीषकुमार नाईक यांचे मनोगत : ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधायचा असेल, तर गावागावांना जोडणारे रस्ते आणि शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत पोहोचण्यासाठी चांगले पाणंद रस्ते असणे अत्यंत आवश्यक आहे. पावसाळ्यात अनेक शेतकऱ्यांना शेतापर्यंत जाण्यासाठी **(पान ४ वर)**

व्यंकटरमणा.. गोविंदा..च्या गजरात भाविकांनी ओढला रथ; एकशे अठ्ठेचाळीस वर्षांची परंपरा

धुळे, दि. २२- शहराच्या सांस्कृतिक क्षेत्रात एकशे अठ्ठेचाळीस वर्षांची परंपरा लाभलेल्या श्री बालाजींचा रथ भाविकांनी मोठ्या श्रध्देने ओढला. दहा दिवस विविध वहनांच्या मिरवणूक पूर्ण झाल्यानंतर शेवटी श्री बालाजींची मुर्तीची भव्य मिरवणुक रथातून शहराच्या प्रमुख मार्गाने काढली जाते. रथाच्या पहिल्या आरतीचा मान मागील १४७ वर्षांपासून कै.बाबुलाल बालाराम अग्रवाल यांच्या कुटुंबियांना मिळतो. त्यानुसार यावर्षीही



अग्रवाल कुटूंबियांनी रथाची पहिला आरती झाल्यानंतर रथ ओढण्यास भाविकांनी सुरूवात करण्यात आले.

यावर्षी कै.बाबुलाल बालाराम अग्रवालांचे वारसदार कमलनयन बाबुलाल अग्रवाल, मंगलबाई कमलनयन अग्रवाल, मयुरेश कमलनयन अग्रवाल, कल्पेश अग्रवाल, वर्षा मयुरेश अग्रवाल, उज्वला कल्पेश अग्रवाल, खुशी, योगिता, **(पान ४ वर)**

सातरणे गावात चौघांना मारहाण

धुळे, दि.२२- घरासमोर गुलाल उधळल्यावरून वाद करीत चौघांना मारहाण केल्याची घटना सातरणे (ता. धुळे) येथे घडली. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

मंगळवारी (२० ऑक्टोबर) रात्री साडेनऊच्या सुमारास गावातील मनोज शांताराम कोळी यांच्या अंगावर व घरावर गुलाल फेकला. त्या त्याबाबत विचारणा केल्यावरून संशयित शुभम सुनिल भिल, लहु रावसाहेब भिल, प्रकाश मोहन भिल तसेच अन्य चार जणांनी एकत्र येत दिलीप कोळी, मनोज कोळी व त्यांच्यासोबत असलेल्या शोभा भिका कोळी, सुरेखा शांताराम **(पान ४ वर)**

शहाद्यात काँग्रेसचा जन आक्रोश मोर्चा शेतकऱ्यांसह वनपट्टेधारकांचा एल्गार.

शहादा,दि.२२ (का.प्र.)- शहादा तालुक्यातील शेतकरी, वनहक्क दावेदार आणि सर्वसामान्य जनतेच्या विविध ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी शहादा शहर व तालुका काँग्रेस कमिटी आणि जिल्हा काँग्रेस कमिटी तर्फे चलो शहादा जन आक्रोश मोर्चाचे आयोजन शुक्रवार दि. २३ रोजी आयोजन करण्यात आले आहे.

शेतकरी, कष्टकरी आणि वनपट्टेधारकांना वनपट्टे मिळावेत, एसआयआर प्रक्रिया रद्द करावी यासह विविध मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे. आपल्या हक्क आणि न्यायासाठी सर्व शेतकरी बांधव, कष्टकरी, युवक, युवती, महिला आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.मोर्चातील प्रमुख मागण्यांत दुष्काळी परिस्थितीत जनतेला योग्य मोबदला मिळावा. वनपट्टेधारक वनजमीनधारक आणि महसूल शेतकऱ्यांच्या शेतीचे सरसकट पंचनामे करून तातडीने भरपाई मिळावी.वनदावेधारक व भोगवटदारांच्या ७/१२ उताऱ्यावरील मवनक्षेत्रफया नोंदीस आणि शासन निर्णयास तीव्र विरोध असून सदर अन्यायकारक शासन निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा. वनहक्क दावे व सातबारा नोंदीमधील त्रुटींची त्वरित सुधारणा करावी.प्रलंबित व प्रस्तावित सर्व वनदावे त्वरित निकाली काढावेत.स्थानिक सर्व जनतेला हक्काचा रोजगार उपलब्ध व्हावा. स्थलांतरित मजुरांचे स्थलांतर थांबवण्यासाठी त्यांना स्थानिक भागातच रोजगाराची हमी द्यावी. वाढती पाणीटंचाई पाहता शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात. एसआयआर प्रक्रिया त्वरित रद्द करण्यात यावी.दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपये मिळावे आदि मागण्यांचा समावेश आहे.हा मोर्चा दि.२३ रोजी सकाळी **(पान ४ वर)**

तापी नदी पात्रात युवकाची आत्महत्या

शिरपूर दि.२२(का.प्र.)- तालुक्यातील विखरण येथील युवकाने सावळदे येथील पुलावरुन तापी नदीत उडी टाकून आत्महत्या केली. त्याचा मृतदेह २२ ऑक्टोबरला सकाळी आढळला. भूषण संजय पाटील (वय २५) असे मृत युवकाचे नाव असून २० ऑक्टोबरच्या दुपारी दोनपासून तो घरात कोणालाही न सांगता निघून गेला होता. तेव्हापासून त्याचा शोध सुरु होता. सावळदे येथील पुलावर भूषणची मोटारसायकल क्र. एमएच १८/बीएस-३८८५ चप्पल, मोबाईल, **(पान ४ वर)**

कर्मचाऱ्यांनी मागण्यांसाठी केले ऑन लाईन काम बंद आंदोलन

नंदुरबार, दि.२२ (प्रतिनिधी)- जिल्हा परिषद आस्थापनेवरील सर्व संवर्गीय आरोग्य कर्मचारी, हिवताप कर्मचारी, एन.एच.एम. कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी यांचे त्यांच्या विविध मागण्यांसाठी ऑनलाईन काम बंद आंदोलन भारतीय मजदूर संघ व आरोग्य सेवा कर्मचारी महासंघाच्या नेतृत्वाखाली गेल्या दहा दिवसांपासून सुरू असून आंदोलनाचा पुढील निर्णायक टप्पा बेमुदत काम बंद व धरणे



आंदोलन राहणार आहे.

आरोग्यवर्धिनी उपकेंद्र स्तरावर कार्यरत आरोग्य सेवक, आरोग्य सेविका यांचेवर समुदाय आरोग्य अधिकारी यांचे अन्यायकारक प्रशासकीय नियंत्रण रद्द करावे, आरोग्य सेवेत २४ तास कार्यरत असणाऱ्या सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांना बायोमेट्रिक हजेरी व फेस रीडिंग ची सक्ती नसावी, इन्सेंटिव्ह भत्ता दरमहा नियमित मिळावा व त्यातील त्रुटी दूर व्हाव्यात, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी यांच्या इन हाऊस लॅब टेस्ट साठीच्या साधन सामुग्री उपलब्ध नसल्याने सक्ती नसावी, औषध निर्माण अधिकारी यांना शासन सेवा प्रवेश नियम १९६७ नुसार पदोन्नतीची वेतनश्रेणी मिळावी, १० वर्ष सेवा झालेल्या एन.एच.एम.कर्मचाऱ्यांना कायम स्वरुपी समायोजनाचे आदेश त्वरीत मिळावे या व इतर प्रलंबित मागण्यांसाठी नंदुरबार जिल्ह्यातील सर्व संवर्गीय आरोग्य कर्मचाऱ्यांनी गेल्या दहा दिवसांपासून पोर्टल, पोर्टल आदी ऑनलाईन काम १०० टक्के **(पान ४ वर)**

नवलनगर येथे दोघांवर हल्ला

धुळे, दि.२२- नवलनगर (ता. धुळे) येथे दुचाकीला पाय लागल्याच्या किरकोळ कारणावरून दोघा भावांवर चाकूने हल्ला केल्याची घटना घडली. या प्रकरणी एका संशयितविरुद्ध धुळे तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

नवलनगर गावातील बस थांबा जवळ मंगळवारी (ता.२०) रात्री दहाच्या सुमारास निखील भरत पाटील (२४, रा. नवलनगर) याचा भाऊ शुभम भरत पाटील याचा पाय मोटारसायकलीला लागला, त्यावरून वाद घालत संशयीत तुषार ऊर्फ बाळा प्रदीप कदम **(पान ४ वर)**

सोनगीर येथे श्री बालाजी रथाचे मुकुंद महाराजांच्या हस्ते पूजन

सोनगीर दि.२२(प्रतिनिधी)- येथील १७१ वर्षांची देदीप्यमान परंपरा आणि ऐतिहासिक वारसा लाभलेला श्री बालाजी महाराज रथोत्सव अत्यंत भक्तिमय वातावरण आणि अलोट उत्साहात पार पडला. परिसरातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, पुढील वर्षात चांगला पाऊस पडू दे आणि बळीराजासह व्यापाऱ्यांना समाधानाचे दिवस येऊ दे,अशी आर्त प्रार्थना भाविकांनी श्री बालाजी महाराजांच्या चरणी केली.



उत्सवाच्या दिवशी सकाळी ७ च्या सुमारास रथ मार्गाने भूमी शांती वहन मिरवणूक निघाली. बालाजी संस्थानाचे पुजारी मुकुंदराज भंडारी महाराज यांच्या उपस्थितीत, आनंद वन संस्थानाचे मठाधिपती मुकुंदराज महाराज यांच्या हस्ते रथाचे विधीवत पूजन करण्यात आले.

गावाचे प्रथम नागरिक तथा प्रभारी सरपंच लखन ठेलारी यांच्या हस्ते सपत्नीक रथावर विराजमान बालाजी महाराजांची भावपूर्ण महाआरती **(पान ४ वर)**

रथोत्सवात हातसफाई अनेक सोनपोत लंपास

धुळे, दि.२२- शहरातील बालाजी रथोत्सवात चोरांच्या टोळीने मोठ्या प्रमाणात हातसफाई केली आहे. खोलगल्लीतील बालाजी मंदिरापासून रथोत्सवाला सुरूवात झाल्यानंतर सुर्यास्तापासून रात्री साडे नऊ पर्यंत सुमारे पन्नास महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरीस गेले आहेत. आझाद नगर पोलीस स्टेशनला अनेक महिलांनी कुटुंबियांना घेवून तक्रारी केल्या. पोलीसांनी त्या आधारे तीन संशयित महिला व दोन पुरूषांना चौकशीसाठी ताब्यात घेतल्याचे सांगण्यात येत आहे. रथोत्सवाचा मार्ग हा शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीतही येतो. त्यामुळे शहर पोलीस स्टेशनला दागिने चोरीस गेल्याच्या काही तक्रारी दाखल **(पान ४ वर)**

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,33,250 रु.+3% GST
सोने- 24 K -1,45,150 रु.+3% GST
चांदी- 2,11,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

सोनगीर दि. २१ (प्रतिनिधी) येथील माजी पंचायत समिती सदस्य,माजी सरपंच,विद्यमान ग्रा. स. तसेच शंकरराव आनंद महाजन नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन अविनाश महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त गावकरी व त्यांच्या मित्र परिवारा मार्फत राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धा आयोजित करण्यात येऊन विकलांग विद्यार्थी,अनाथाश्रमातील आजी -आजोबा तसेच सोनगीर येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सदस्यांना मिष्टांन्न भोजन देण्यात आले.राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धा गावकरी व जिल्ह्यातील हॉलीबॉल खेळाडूंसाठी विशेष आकर्षणाची केंद्रबिंदू ठरली.



अविनाश महाजनांच्या वाढदिवस निमित्त

राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा संपन्न गडचिरोलीच्या लॉर्डस मेटलची बाजी

येथील सामाजिक, राजकीय क्षेत्रातील दानशूर व्यक्तिमत्व अविनाश महाजन यांचा वाढदिवस त्यांचा मित्रपरिवार व गावकऱ्यांनी विशेष उपक्रम राबवून साजरा केला. गोरगरीब सर्वसामान्य जनतेच्या अडीअडचणी सोडवण्यात नेहमी अग्रभागी असणारे अविनाश महाजन यांना गावकऱ्यांचे विशेष प्रेम लाभले आहे.म्हणूनच त्यांच्या वाढदिवसाला मित्रपरिवार व गावकऱ्यांनी विशेष कार्यक्रम आयोजित केले होते.यात सोनगीर गावात पहिल्यांदा भव्य राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत राज्यभरातील ३० नामांकित संघानी सहभाग घेतला. स्पर्धेत मुंबई,पुणे,नाशिक,जळगाव,गडचिरोली,शिरपूर आदी शहरातील हॉलीबॉल क्लबचे संघ सहभागी झाले होते.सुमारे ४८ तास सलग चाललेली ही स्पर्धा हॉलीबॉल प्रेमींच्या डोळ्यांची पाडणे फेडणारी ठरली. येथील हायस्कूलच्या भव्य मैदानावर हॉलीबॉल स्पर्धेची विशेष व्यवस्था करण्यात आली होती. या स्पर्धेतील ३१ हजार रुपये रोख रकमेचे बक्षीस गडचिरोली येथील लॉर्ड्स मेटल या संघाने तर द्वितीय क्रमांकाचे २१ हजार रुपयांचे रोख बक्षीस मुंबई येथील भाग्य ११ या संघाने व तृतीय क्रमांकाचे बक्षीस ११ हजार रुपये रोख पुणे येथील एबीएसएफ या संघाने पटकावले. या स्पर्धेचे पंच म्हणून धुळे येथील राजेंद्र बारी, गुड्डू सर, प्रा.नरेंद्र पाटील तसेच किशोर लोहार यांनी काम पाहिले. जय बजरंग मित्र मंडळ तर्फे बजरंग चौकात श्री महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त **(पान ४ वर)**

आपला महाराष्ट्र

फटाके उडविण्यावरील बंदी आणि वास्तव

मुंबई उच्च न्यायालयाने नुकताच एका याचिकेवर निर्णय देताना अतिशय क्रांतिकारी म्हणवले जातील असे निर्देश सरकार आणि प्रशासनाला दिले आहेत. मात्र, या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी नेमकी कोणी करायची, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. पोलिसांनी करायची, संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी करायची की लोकांच्या सदसद्विवेकबुद्धीवर आणि स्वयंस्फूर्त सहभागावर ती सोडून द्यायची, याबाबत स्पष्टता आवश्यक आहे.आपल्याकडे सणासुदीच्या काळात प्रचंड प्रमाणात फटाके उडविले जातात. घराघरांत फटाके आणले जातात आणि त्यांतील बहुतांश फटाके रस्त्यांवर किंवा सार्वजनिक ठिकाणी फोडले जातात. जर रस्त्यांवर आणि सार्वजनिक ठिकाणी फटाके उडविण्यास बंदी असेल, तर मग फटाके नेमके कुठे उडवायचे? घराच्या गच्चीवर उडवावेत की सामुदायिक मैदानावर जाऊन उडवावेत याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे निश्चित नसतील, तर बंदीची अंमलबजावणी कशी होणार असा गहन प्रश्न निर्माण झालेला आहे.

शिवाय, फटाके उडविणाऱ्यांची संख्या लक्षात घेता त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांचा किती मोठा फौजफाटा लागेल, याची कल्पनाच केलेली बरी! एवढ्या मोठ्या प्रमाणावर पोलीस उपलब्ध होऊ शकतील का आणि ते सर्वत्र प्रभावी नियंत्रण ठेवू शकतील का, हे प्रश्न आहेतच. त्यामुळे केवळ आदेश काढून अशा प्रकारच्या बंदीची व्यावहारिक अंमलबजावणी करणे सोपे दिसत नाही.

फटाक्यांचे प्रकार भरपूर आहेत.दरवर्षा नवनवे प्रयोग या क्षेत्रात होतात. सुतळी आणि कागदी फटाके, फुलबाज्या, टिकल्या, झाडे, रॉकेट, आकाशात सप्तरंगी रोषणाई करणारे फटाके, चक्री, लवंगी अशा असंख्य प्रकारच्या फटाके उडविण्यात लहानांपासून मोठ्यांपर्यंत अनेक जण दंग असतात. दिवाळीच्या काळात सुमारे आठवडाभर अनेक शहरांतील आणि गावांतील आकाश धुराने काळवंडलेले दिसते. डोळ्यांची आग होते, श्वसनाचे त्रास वाढतात आणि फुप्फुसांच्या आजारांनी त्रस्त असलेल्या व्यक्तींना अधिक त्रास सहन करावा लागतो. या सगळ्याचा विचार किती गांभीर्याने केला जातो या प्रश्नाचे उत्तरही मिळणार नाही एवढा निष्काळजीपणा आणि बेजबाबदारपणा आपल्याकडे आहे. प्रदूषणाच्या या प्रश्नाबरोबरच दुष्काळ आणि पाण्याच्या टंचाईचाही विचार व्हायला हवा. नवरात्रोत्सवात अनेक ठिकाणी दिसून आलेला उत्साह आणि उत्सव साजरा करण्यासाठी होणारी प्रचंड ऊर्जा खर्च करण्याची तयारी पाहिली, की आपल्या सामाजिक प्राधान्यक्रमांविषयी प्रश्न पडतो. एकीकडे पाणीटंचाई आणि दुष्काळाची चर्चा सुरू असते, तर दुसरीकडे उत्सवातील खर्च आणि ध्वनी-प्रदूषण यांना मर्यादा घालण्याची तयारी करण्याचे दिसत नाही.अशा परिस्थितीत फटाक्यांवरील बंदीचे नेमके काय होणार, हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो.

महाराष्ट्रात गुटखाबंदी लागू आहे. तरीही गुटख्याचे उत्पादन आणि विक्री पूर्णपणे थांबलेली नाही. बंदी असतानाही गावोगावी आणि शहरांत चढ्या दराने गुटखा उपलब्ध होतो. सीमावर्ती राज्यांतूनही त्याची आवक होत असल्याच्या तक्रारी आहेत. म्हणजेच, एखाद्या वस्तूवर बंदी घातली म्हणून तिचा वापर आपोआप थांबत नाही. बंदीची अंमलबजावणी, पुरवठ्यावर नियंत्रण आणि लोकांची मानसिकता बदलणे या तिन्ही गोष्टी आवश्यक ठरतात.

फटाक्यांच्या बाबतीतही असाच पेच निर्माण होतो. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अर्थ फटाक्यांचे उत्पादन आणि विक्री यांवर सरसकट बंदी असा नाही. उत्पादन आणि विक्रीवर सर्वंकष बंदी नसताना, सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडण्यावर निर्बंध घालून त्यांची अंमलबजावणी कशी करायची, याबाबत सरकार आणि प्रशासनाने स्पष्ट मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. नागरिकांना कशाची परवानगी आहे, कोणत्या ठिकाणी फटाके फोडता येणार नाहीत आणि नियमांचे उल्लंघन झाल्यास कोणती कारवाई होईल, हे स्पष्ट झाले पाहिजे.अनेक वेळा न्यायालयाच्या आदेशाकडे ही कानाडोळा केला जातो.त्यामुळे सर्वांचेच फावते ही वस्तुस्थिती आहे.

गणेशोत्सवातील डीजे आणि डॉल्बीवरील निर्बंधांचा अनुभव या संदर्भात महत्त्वाचा आहे. डीजेच्या मोठ्या आवाजाविरोधात महाराष्ट्रात आंदोलने झाली. पुण्यात तर बंदीची मागणी करणाऱ्यांना मारहाण झाल्याच्या घटनाही पुढे आल्या. अनेक ठिकाणी नागरिकांनी डीजेच्या वापरावरील निर्बंधांच्या समर्थनार्थ मोर्चे काढले आणि प्रशासनावर दबाव आणला. लोकांच्या या भूमिकेमुळे प्रशासनाला कारवाईसाठी पुढाकार घ्यावा लागला. परिणामी, अनेक ठिकाणी डीजेचा वापर टाळून गणेशोत्सव साजरा करण्यात आला.या अनुभवातून एक गोष्ट स्पष्ट होते. सामाजिक प्रश्न केवळ प्रशासनाच्या भरवशावर सोडून चालत नाहीत. नागरिकांनी एखाद्या प्रश्नाचे गांभीर्य ओळखून संघटितपणे भूमिका घेतली, तर प्रशासनालाही कार्यवाही करणे शक्य होते. डीजेमुक्त गणेशोत्सवासाठी निर्माण झालेली जनजागृती पुढील वर्षीही टिकून राहावी, यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.फटाक्यांच्या बाबतीतही अशीच जनजागृती निर्माण होण्याची गरज आहे. प्रदूषणाचे दुष्परिणाम माहीत असूनही केवळ परंपरेच्या नावाखाली त्याकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. फटाके न फोडणाऱ्यांच्या अधिकारांचा आणि आरोग्याचा विचार फटाके फोडणाऱ्यांनीही केला पाहिजे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि श्वसनविकार असलेल्या व्यक्तींना होणारा त्रास लक्षात घेतला पाहिजे.यासाठी नागरिकांनी स्वत:हून पुढाकार घेणे आवश्यक आहे. सार्वजनिक मंडळे, गृहनिर्माण संस्था, सामाजिक संघटना, शाळा-महाविद्यालये आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकत्र येऊन प्रदूषणमुक्त दिवाळीसाठी कार्यक्रम आखता येतील. फटाके फोडण्याऐवजी दिव्यांची रोषणाई, सामूहिक सांस्कृतिक कार्यक्रम, गरजू कुटुंबांना मदत आणि पर्यावरणपूरक उपक्रम यांद्वारे दिवाळीचा आनंद अधिक अर्थपूर्ण करता येईल. सार्वजनिक ठिकाणी नियमांचे उल्लंघन होत असल्यास कायद्याच्या चौकटीत राहून त्याविरोधात आवाज उठविणेही आवश्यक आहे.

अर्थात, याचा अर्थ दिवाळीचा आनंद हिरावून घेणे असा नाही. सण-उत्सव हे आपल्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचे अविभाज्य अंग आहेत. मात्र, आनंद साजरा करताना दुसऱ्याच्या आरोग्याचा, शांततेचा आणि पर्यावरणाचा विचार करणे ही देखील सामाजिक जबाबदारी आहे. वैयक्तिक आनंद आणि सार्वजनिक हित यांच्यात समतोल राखणे हीच खऱ्या अर्थाने सुसंस्कृत समाजाची ओळख आहे.न्यायालयाने निर्देश दिले म्हणून सर्व काही आपोआप घडेल, अशी अपेक्षा ठेवता येणार नाही. सरकारने स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली पाहिजेत, प्रशासनाने त्यांची निष्पक्ष अंमलबजावणी केली पाहिजे आणि नागरिकांनी त्याला स्वयंस्फूर्त सहकार्य केले पाहिजे. या तिन्ही घटकांनी आपापली जबाबदारी स्वीकारली, तरच प्रदूषणावर नियंत्रण मिळविणे शक्य होईल.दिवाळीचा आनंद कोणीही हिरावून घेणार नाही. मात्र, हा आनंद साजरा करताना सार्वजनिक भान जपण्याची वेळ आता आली आहे. फटाक्यांवरील बंदीच्या चर्चेचा शेवट केवळ कायदेशीर आदेशापुरता मर्यादित न राहता, प्रदूषणमुक्त आणि अधिक संवेदनशील समाजाच्या निर्मितीत व्हायला हवा. त्यासाठी प्रशासनाबरोबरच प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे.आपल्या राज्यात संस्कृती रक्षकांची एक नवी जमात उदयाला आलेली आहे.चुकीचा आणि हानीकारक परंपरांचा आग्रह करतांना तथाकथित संस्कृती रक्षकही त्यात पोळलेले असतात. त्यांच्या कुटुंबातील सदस्य बाधीत झालेले असतात परंतु प्रारब्धाच्या गोंडस कोंदणात परंपरा बसवून आग्रही असणाऱ्यांची संख्या मोठी असते. त्यांनाही समाजानेच वठणीवर आणले पाहिजे.

कझगावचे विश्वनाथ शिंपी धुळ्यातून हरविल्याची नोंद



धुळे, दि. २२ : कझगाव (ता. भडगाव, जि. जळगाव) येथील ६८ वर्षीय विश्वनाथ सिताराम शिंपी हे धुळे शहरातील एकवीरा देवीच्या दर्शनासाठी आले होते. पण, ते घरी परतले नाहीत. बेपत्ता झालेल्या विश्वनाथ शिंपी यांच्याबाबत देवपूर पोलीस ठाण्यात हरविल्याची नोंद करण्यात आली आहे. पोलिस यंत्रणा त्यांचा शोध घेत आहे.

देवपूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विश्वनाथ शिंपी हे सोळा ऑक्टोबरला दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास पत्नी मिनाबाई शिंपी यांच्यासह कझगाव येथून धुळे येथे एकविरा देवीच्या दर्शनासाठी आले होते. दर्शन घेतल्यानंतर ते घरी परतलेच नाहीत. नातेवाईकांनी धुळे शहर आणि देवपूर परिसरात शोध घेतला. मात्र, त्यांचा पत्ता लागला नाही. त्यांचा मुलगा मयुर विश्वनाथ शिंपी याने कळविल्यानुसार देवपूर पोलीस ठाण्यात हरविल्याची नोंद करण्यात आली आहे. हरविलेले विश्वनाथ सिताराम शिंपी सावळ्या रंगाचे असून त्यांची उंची पाच फूट आहे. चेहरा लांब, डोळे मोठे, नाक सरळ, केस पांढरे-काळे आहेत. हरविले त्यावेळी त्यांच्या अंगात हिरव्या रंगाचा पूर्ण बाहीचा शर्ट, काळ्या रंगाची पॅन्ट आणि पायात काळ्या रंगाचे रबरी बूट होते. त्यांना मराठी आणि अहिराणी भाषा बोलता येते. वर्णन सदृष्य व्यक्तीबद्दल काही माहिती मिळाल्यास तात्काळ देवपूर पोलीस ठाण्यात ०२५६२-२८२२१९ किंवा ९१३०४८९३ या मोबाईल क्रमांकावर संपर्क असे आवाहन पोलीस हवालदार विनोद पारोळेकर यांनी केले आहे.

गरूड जि.वाचनालयात दिवाळी अंक योजना सुरू

धुळे, दि.२२- शहरातील जेल रोड क्युमाईन क्लब समोरील धोंडो शामराव गरूड जिल्हा वाचनालय येथे दिवाळी निमित्त दिवाळीपूर्वीच वाचकांसाठी दिवाळी अंकांची मेजवानी मिळणार आहे. नोव्हेंबर, डिसेंबर २०२६ व जानेवारी २०२७ अशा तीन महिन्यांसाठी दिवाळी अंक योजना राबविण्यात येणार आहे.

एक अंकासाठी दोनशे रूपये व एका वेळी दोन अंकासाठी केवळ चारशे रूपये वर्गणी भरावयाची आहे. सभासद नसलेल्या व्यक्तीस दोनशे रूपये अनामत भरून योजनेत सहभागी होता येणार आहे. दि.७ नोव्हेंबर पर्यंत मुदत आहे. त्यानंतर दिवाळी अंक योजनेत सहभागी होणाऱ्या सभासदास अडीचशे रूपये भरून सहभागी होता येणार आहे.

विनोदी, धार्मिक, भविष्य विषयी, महिलांसाठी खास सौंदर्य, पाककला, आरोग्य विषयी, कथा-कादंबरीयुक्त, बालगोपालांसाठी निवडक दिवाळी अंक समाविष्ट करण्यात येणार आहेत. योजनेची सभासद नोंदणी वाचनालयाच्या वेळेत सुरू राहिल. वाचकांनी योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन वाचनालयाच्या सर्व संचालक मंडळाने केले आहे.

प्रकाश में आज-बलिदान



जितेंद्र, श्रीदेवी, शक्ती कपूर, कादर खान

मोबाईल चोरणाऱ्याला बारा तासांत पकडले

धुळे, दि.२२- येथील देवपूर लाला सरदार नगरमधील घरातून चोरट्याने मोबाईलसह रोकड लंपास केल्याची घटना घडली. देवपूर पोलिसांनी तपासाला वेग देत अवघ्या बारा तासाच्या सराईत गुन्हेगाराला जेरबंद केले. त्याच्याकडून एक लाखाचा मुद्देमाल हस्तगत केला.

देवपूर मधील लाला सरदार नगर जवळ आजम महंमद फाजिल पठाण (रा. महंमदी मशिदजवळ) यांच्या घरातुन चोरट्याने दहा हजारांची रोकड व मोबाईल चोरुन नेले. २० ऑक्टोबरला चोरीचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी आजम पठाण यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार देवपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. देवपूर पोलीस ठाण्याचे सहायक निरीक्षक प्रतापसिंग मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सराईत गुन्हेगार तौसिफ ऊर्फ पापा भिकन तांबोळी (वय २२ वर्ष, रा.नेहरु नगर, मास्तरवाडी, देवपूर धुळे) यास ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता त्याने गुन्हयाची कबुली दिली. त्याच्याकडून पोलिसांनी वेगवेगळ्या कंपनीचे पाच मोबाईल असा एकुण १ लाख एक हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. सराईत गुन्हेगार तौसिफ तांबोळी याच्याविरुध्द यापुर्वी घरफोडी व चोरीचे एकुण आठ गुन्हे दाखल आहेत. पोलीस अधीक्षक विशाल आनंद सिंगुरी, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, उपअधीक्षक राजकुमार उपासे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक मोहिते, हवालदार मिलींद सोनवणे, किरण मेहरुणकर, महेंद्र भदाणे, भटेंद्र पाटील, राहुल गुंजाळ, नितिन चव्हाण, वसंत कोकणी, सौरभ कुटे, शुभम बोरसे यांनी कारवाई केली.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, विशेषत: खाजगी सावकार, नोकर, चाकर व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे रूदाणे, ता.शिंदखेडा, जि.धुळे हद्दीतील गट नं. २११ चे एकूण सामाईक क्षेत्र २ हे. ०८ आर सदर मिळकत ही महसुल दप्तरी १) राजेंद्र रघुनाथ जाधव २) आशाबाई विलास पाटील ३) कमलबाई रघुनाथ पाटील ४) देविदास वामन पाटील ५) नितीन रघुनाथ जाधव ६) भटाबाई हिमंत पाटील ७) मनिषाबाई विजय पाटील ८) लोटन सिताराम जाधव ९) सुभाष सिताराम जाधव १०) लताबाई शेणपडू पाटील ११) अनिल गंगाराम पाटील १२) चंद्रशेखर विलास पाटील १३) भावना प्रशांत पाटील १४) अपेक्षा निंबा पाटील १५) विजयाबाई भिकनराव सोनवणे १६) सुनंदा भिकन सनेर १७) शेनपडू चैत्राम पाटील १८) श्रीकृष्णजी दिलीप देवरे १९) नवनाथजी दिलीप देवरे २०) महालक्ष्मी रवींद्र सोनवणे २१) नितीन नाटु शिरसाठ २२) प्रवीणा शालिग्राम शिरसाठ २३) कल्पेशकुमार शालिग्राम पाटील २४) वंदना राजेंद्र पाटील यांचे नावे व कब्जे ताबेउपभोगात आहे. सदर मिळकत आमचे अशील स्वत: किंवा त्यांनी नामनिर्देशीत केलेल्या व्यक्तीशी/कंपनीशी खरेदी करण्याचा करार मिळकत मालकांशी केलेला असून त्या व्यवहारा पोटी बयाणा रक्कम देखील दिलेला आहे, त्याप्रमाणे आमचे अशील किंवा त्यांनी नामनिर्देशीत केलेल्या व्यक्तीशी/कंपनीशी लवकरच खरेदीखत देखील नोंदविणार आहेत.

वर नमुद मिळकतीबाबत नमूद केलेल्या बँक, सहकारी पतसंस्था, सोसायटी च्या इतर हक्कात नमूद केलेल्या कर्जाव्यतिरिक्त इतर कोणाचेही कोणत्याही प्रकारची मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, गहाण, बोजा, टांच, जप्ती, भाडेपट्टा हक्क अथवा वित्त संस्था, बँका पतसंस्था यांचा सदर मिळकतीवर बोजा असल्यास मुळ कागदपत्रासह खालील पत्यावर १५ (पंधरा) दिवसांच्या आत आपली लेखी हरकत नोंदवावी. सदर मिळकती बाबत मुदतीत कोणाचीही काही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्बोज, निर्वेज आहे असे समजून आमचे अशिल स्वत: किंवा त्यांनी नामनिर्देशीत केलेल्या व्यक्तीशी/कंपनीशी सदर खरेदीचा व्यवहार मालकांशी पुर्ण करतील. सदर मुदतीनंतर आलेल्या तसेच तृत्तपत्रात परस्पर घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. तसेच कोणाचीही कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत असल्यास संपुर्ण कागदपत्रानिशी खाली दिलेल्या पत्यावर मुदतीत संपर्क साधावा. तसेच मुदतीत लेखी हरकत न घेतल्यास त्या अनुशगाने होणाऱ्या खर्चास व परिणाम आमचे अशिल जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहितीवरून व दाखविलेल्या कागदपत्रावरून तसेच त्यांचे सांगितलेवरून त्यांचे तर्फे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे, दि.२१/१०/२०२६

ॲड.निलेश पुरूषोत्तम कुलकर्णी

नोटरी भारत सरकार, ५७, सैनिक कॉलनी, आकाशवाणी केंद्राच्या मागे, नगांवबारी,देवपूर धुळे. (महा.) **मो. ९५८८४१३६९२,९८२२०८२७५८**

जाहीर नोटीस

तमाम जनतेस सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यत येते की, तु. जि. धुळे पो. तु. ता. जि. मिळकतीचे वर्णन :- मौजे धुळे ता.जि.धुळे येथील महानगर पालीका हद्दीतील महिंदळे शिवारातील गट क्र.१०३/२/३/६६/अ बखळ प्लॉट, एकुण क्षेत्र १.१२.५० आर. चौ.मी. आकार रू. ११.५० पैसे, त्यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे-

पुर्वेस :- प्लॉट नं. ६५ पश्चिमेस :- प्लॉट नं.६७/अ
दक्षिणेस :- प्लॉट नं.६३/अ व ब उत्तरेस :- रस्ता व ओपनस्पेस

येणेप्रमाणे वर नमुद वर्णनाची मिळकीचे हल्ली मालक व कब्जेदार श्री. विजय दगा शिंदे, रा.धुळे यांच्याशी श्री.सचीन बी.सोनवणे यांनी तोंडी सौदा केला होता त्यानुसार त्यांनी बयाणा रक्कम देवुन १३/१०/२०२६ रोजी दै. आपला महाराष्ट्र या वृत्तपत्रात जाहिर नोटीस प्रदर्शीत केली होती. परंतु काही वैयक्तीक कारणामुळे प्रस्तुत सौदा रद्द झालेला आहे व घेतलेली बयाणा रक्कम श्री. विजय दगा शिंदे यांनी श्री. सचीन बी. सोनवणे यांना परत केलेली आहे.

सदर मिळकतीबाबत श्री. विजय दगा शिंदे आणि श्री. सचीन बी. सोनवणे यांचेशी कोणत्याही प्रकारे वर नमुद सौदा चा कुठल्याही व्यवहार राहिलेला नाही. तसेच देणे घेणेही राहिलेले नाही. त्यामुळे सदरचा सौदा अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क व अधिकार राहिलेले नाही. म्हणुन सदरची नोटीस दैनिक वर्तमानपत्रात प्रसिद्धीस दिली असे.

सदर मिळकतीबाबत/सौद्या बाबत कोणाचेही काही हरकत असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्यावर पुराव्यानिशी लेखी हरकत घ्यावी. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरण्यात येणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकतीबाबत श्री. विजय दगा शिंदे हे दुसऱ्या व्यक्तीशी व्यवहार/हस्तांतरण करण्यास मोकळे राहतील. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा पुढील व्यवहार पुर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची नोटिस आमचे अशिलांने दिलेल्या माहिती व दाखविलेल्या कागदपत्रावरून व सांगण्यावरून आमचेमार्फत प्रसिद्धीस दिली असे.धुळे – दि. २१/१०/२०२६

ॲड. प्रफुल्ल चतूर चित्ते मो. ९७९७८४१२९९

बोधीसत्व, ३५, जेय बजरंग सो.साक्री रोड,धुळे.

पान १ वरुन

शिंदेंबद्दल निर्माण होणारे प्रश्न मान्य नाही : शेलार

उदय सामंत यांचा गैरसमज झाला असेल. समज करुन घेतला असता तर त्यांनी हे विधान केले नसते. ज्या ऑडिओ क्लिपची सत्यता फिक्स नाही, ज्याची चौकशी झालेली नाही. पूरक असा पुरावा नाही. ऑडिओ क्लिपमुळे सत्यता पुढे येऊ शकत नाही. त्यामुळे उदय सामंत यांचा गैरसमज झाला असेल तर दूर करु, असे आशिष शेलार यांनी म्हटले. यात भाजपच्या कोणत्याही नेत्याचा आवाज नाही, ऑडिओ क्लिप सत्य आहे की नाही स्पष्ट झालेले नाही. तंत्रज्ञानासंदर्भातील अशा गोष्टींना पूरक पुरावा लागला तर ते सत्य मानले जाते, हे त्यांना माहिती नसेल तर त्यांचा गैरसमज दूर करु, असे आशिष शेलार म्हणाले. शिंदे साहेबांवर कोणीही प्रश्नचिन्ह उपस्थित करणे आम्हाला मान्य नाही. ते महायुतीचे नेते आहेत, असेही शेलार म्हणाले. मनोज जरांगेंकडे ज्याने ऑडिओ क्लिप दिली असेल ती सत्य आहे की नाही ते पाहिले पाहिजे.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस, तसेच सर्व वित्तीय संस्था, बॅका, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे पिंपरी येथील धुळे म. न. पा. हद्दीतील गट नं. १०८/१/ब पैकी

१) प्लॉट नं. ७६, चे एकूण क्षेत्र ९०.१० चौ. मी. बरखळ प्लॉट.
२) प्लॉट नं. ७७, चे एकूण क्षेत्र ९०.०२५ चौ. मी. बरखळ प्लॉट.
३) प्लॉट नं. ९२, चे एकूण क्षेत्र ८९.९५ चौ. मी. बरखळ प्लॉट.
४) प्लॉट नं. ९३, चे एकूण क्षेत्र ११०.२२ चौ. मी. बरखळ प्लॉट.

असे एकूण चारही प्लॉटस् चे एकूण क्षेत्र ३८०.२९५ चौ. मी. ४०९१.९७ चौ. फुट अशी प्लॉटस त्याची चतु:सिमा नकाशा रेकॉर्डप्रमाणे

सदर सविस्तर नमूद केलेली मिळकत ही गरूड बिल्डर्स अॅण्ड लॅण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार धिरज जवाहरलाल कलंत्री आणि स्नेहा महेश मिस्तरी यांचे नावे असून त्यांनी मोहम्मद साबीर इस्माईल खान पठाण रा. आशियाना कॉलनी, चाळीसगांव रोड, धुळे यांना नोटरी सौदा पावती करुन दिलेली आहे. व सदर प्लॉटस् ताबा हा मोहम्मद साबीर इस्माईल खान पठाण यांच्याकडे आहेत. त्या अनुषंगाने मोहम्मद साबीर इस्माईल खान पाठण यांच्याशी मिळकतीचा खरेदी करण्याचा व्यवहार आमचे पक्षकार रफिक मोहंमद बेग रा. घड्यालवाली मस्जिद जवळ, मौलवीगंज, धुळे ता. जि. धुळे यांनी व्यवहार केलेला असून त्यात असे सुद्धा ठरले होते की, एक कॉर्नरच्या प्लॉट देखील आमचे पक्षकार यांचे नावे खरेदीखत करुन देईल. त्याबाबतची संपूर्ण रक्कम देखील दिलेली आहे व त्याचप्रमाणे आमचे पक्षकार हे लवकरच खरेदीखत देखील नोंदविणार आहे.

तरी सर्वाना या जाहीर नोटीसणे कळविण्यात येते की, सदर प्लॉट सबंधी कोणाचाही कुठल्याही प्रकारे सौदा पावती, हक्क, हित, साबंध देणे घेणे, मालकी हक्क, भाडेपटटा, व लीज, ताबा, गहाण, दान, बोजा, कर्ज, लीज, टाच, वा वारस हक्क, खावटी दृ म.जु. वगैरे कोणत्याही व कुठल्याही प्रकारे हक्क व अधिकार असल्यास सदर नोटीस जाहीर झाल्याचे (०५) पाच दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्राची प्रती सहीत आमचे ऑफिसात हरकती सादर कराव्यात. परस्पर जाहीर नोटीस वर्तमानपत्रावर असल्यास त्या ग्राहय धरण्यात येणार नाही. व हरकती न असल्यास आमचे पक्षकार सदर मिळकत निर्वेध व निर्बोज म्हणुन खरेदी करतील. त्यानंतर आलेल्या हरकती ह्या ग्राह्य धरल्या जाणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटस असे. धुळे दि. २१/१०/२०२६

ॲड.परवेज निसार तांबोळी मो. ७०२०३८१३९४

३५, अविष्कार कॉलनी, चाळीसगांव रोड, धुळे

जाहीर नोटीसीस तिव्र हरकत

तमाम जनतेस, सर्व हित संबंधितांना तसेच सर्व वित्तीय संस्था व स्थानिक स्वराज्य संस्था यांना तसेच मुखत्वे धुळे तालुक्यातील आणि विंचूर परिसरातील नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे आमचे अशिल श्री. अशिल श्री. अनुराग राजेंद्र पाटील रा. बडगुजर प्लॉट, दत्त मंदिराजवळ, धुळे द्वारा कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकतीचे मालक १) सुबोधसिंह रतनसिंह चौहान (राजपूत) २) सुनिल रतनसिंह चौहान (राजपूत) ३) सुभाष रतनसिंह चौहान (राजपूत), ४) सुनिता गोपालसिंह परदेशी यांच्या मालकीची व ताबे उपभोगातील मिळकत असून सदर मिळकत त्यांनी आमचे अशिलांशी कायमस्वरुपी विक्रीचा सौदेकरार केलेला असून बयाणा रक्कम देखील स्विकारलेली आहे. तर अधिक रक्कमेच्या लालसेपोटी सदर व्यवहार दुर्लक्षीत करुन ते त्रयस्थांशी परस्पर व्यवहार करण्याचा प्रयत्नात आहेत. याच आशयाची दि., ९/१०/२०२६ रोजी ॲड. जगदीश जी. सुर्यवंशी मार्फत दैनिक आपला महाराष्ट्र वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेली आहे. त्यास आमचे अशिल यांनी समर्पक उत्तर देवून हरकत घेतलेली आहे. तरी देखील तमाम जनतेस आमच्या अशिलांच्या व्यवहाराची माहिती असावी व कोणाचीही दिशाभुल व फसवणूक होवू नये या हेतुने सदर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तरी खालील नमूद मिळकती संदर्भात कोणीही कोणत्याही प्रकारे खरेदी विक्री, गहाण, बक्षीस, लिज वगैरे हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. याउपरही केल्यास सदर व्यवहार हा आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही आणि नाईलाजास्तव व्यवहार करणाऱ्या कोर्ट कचेरीच्या गंभीर स्वरुपाच्या खर्चास आणि परिणामास सामोरे जावे लागेल. याची गंभीर दखल घ्यावी.

परिशिष्ट : मौजे विंचूर ता. जि. धुळे येथील गट क्र. १५६/२ब चे क्षेत्र १ हेक्टर ०३ आर ची शेत मिळकत यांसी चतु:सिमा येणे प्रमाणे.

पुर्व : धुळे चालीसगांव रोड,
पश्चिम : राजधर, सुकलाल आणि विनोद बोरसे यांचे शेत
दक्षिण : विंचूर – शिरुड रोड, उत्तरेस : साहेबराव भदाणे यांचे शेत

येणे प्रमाणे नोटीस आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

ॲड. राजेश नंदलाल अग्रवाल

ऑफिस : ५ दिघे ॲडव्होकेट चेंबर्स धुळे जिल्हा न्यायालयासमोर, स्टेशनरोड, धुळे **सेल नं. ९८५००९२७५३**

जाहीर नोटीस

ॲड.पी.एस. महाजन

धुळे येथील मे.उपविभागीय अधिकारी सो. यांचे कोर्टात

आर.टी.एस. अपिल नं. ०००६४/२०२६

निलाबाई धनराज पाटील,
रा. मु. पो. मोघण ता. जि. धुळे ..अर्जदार

विरूद्ध

१) जितेंद्र भिवसन पाटील
रा. गोंदूर ता.जि.धुळे वगैरे ...जाबदेणार

ज्याअर्थी वरील अर्जदार हिने मे. न्यायालयात विलंब माफ होवून मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे व सदर प्रकरण पुढील कामकाजासाठी जाबदेणार नं. १ यांना नोटीस बजावण्याच्या टप्प्यावर आहे. परंतु जाबदेणार नं. १ यांना वारंवार नोटीस काढून सुद्धा त्याची बजावणी होत नाही. म्हणून सदर जाबदेणार नं. १ यांना दै. ... या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस काढण्यात येत आहे. जर आपणास सदर प्रकरणात हरकत घ्यायची असल्यास दि. २७/१०/२०२६ रोजी हजर व्हावे व आपली लेखी हरकत द्यावी. मुदतीत हजर न झाल्यास जाबदेणार नं. १ अथवा त्याचे वारस अथवा वकीलांमार्फत त्यांची काही एक हरकत न आल्यास सदरकामी चौकशी होवून योग्य तो हुकूम अर्जदाराच्या लाभात होइल.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस कोर्टाचे आमच्या सही शिक्क्यानिशी आज दि. २२/१०/२०२६ रोजी प्रसिद्धीस दिलेली असे

आदेशावरुन

सही... (कोर्टाचा शिक्का) सही...
कामगिरी कारकुन **अधिक्षक**
प्रांत कार्यालय, धुळे, प्रांत कार्यालय, धुळे

जाहीर नोटीस

महाशय दिवाणी न्यायाधिश साहेब (व .स्तर) शहादा यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ४७५/२०२६

दीपिका विजय पटेल ... अर्जदार

।। विरुद्ध।।

कोणीही नाही. ...सामनेवाला

अर्ज : सन १८२७ चे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट मधील ८ चे कलम २ व ७ प्रमाणे वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेसाठी

ज्याआर्थी अर्जदारचे पती कै. विजय टिलाभाई पटेल, यांचा मृत्यू दि. ०८/०८/२०२६ रोजी मौजे कोठली-तर्फे सारंगखेडा, ता.शहादा, जि.नंदुरबार येथे झाला असून वर नमूद अर्जदार यांनी सन १८२७ चे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट मधील ८ चे कलम २ व ७ प्रमाणे वारसदाखल मिळणेसाठी शहादा येथील महाशय दिवाणी न्यायाधीश साहेब (व.स्तर) शहादा यांचे कोर्टात दि.१९/१०/२०२६ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील अर्जा संदर्भात कोणास काही म्हणणे अगर हरकत सादर करावयाचे असल्यास ते सादर करणयासाठी दि.२३/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: अगर वकिलांमार्फत शहादा येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (व.स्तर) शहादा यांचे न्यायालयात हजर राहून लेखी म्हणणे सादर कर

सर सैय्यद ऊर्दू गर्ल्स हायस्कूलमध्ये गांधी विचार संस्कार परीक्षेला प्रतिसाद

शहादा,दि.२१(प्रतिनिधी)- विद्यार्थ्यांच्या मनात सत्य, अहिंसा, शांतता आणि नैतिक मूल्यांची बीजे रुजवून त्यांना सुसंस्कारित व जबाबदार नागरिक घडविण्याच्या उदात्त हेतूने गांधी रिसर्च फाउंडेशन, जळगाव यांच्या वतीने आयोजित गांधी विचार संस्कार परीक्षेचे शहादा येथील सर सैय्यद उर्दू शाळेत आयोजन करण्यात आले. या परीक्षेला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष प्रा. सैय्यद लियाकत अली, शाळेचे प्राचार्य सैय्यद इफ्तेखार अली, तसेच प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ साहित्यिक प्रा.डॉ.विश्वासराव पाटील व कु.सुभद्रा पाटील यांची उपस्थिती लाभली. यावेळी आपल्या अभ्यासपूर्ण आणि मर्मस्पर्शी मार्गदर्शनातून प्रा.डॉ. विश्वासराव पाटील यांनी महात्मा गांधीजींच्या जीवनातील प्रेरणादायी पैलू, त्यांचे सत्य व अहिंसेचे तत्त्वज्ञान आणि मानवतेला दिशा देणाऱ्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले.

गांधी विचार संस्कार परीक्षा ही केवळ ज्ञानाची परीक्षा नसून, विचारांना विवेकाची, आचरणाला मूल्यांची आणि व्यक्तिमत्त्वाला मानवतेची जोड देणारा एक प्रेरणादायी उपक्रम आहे. गांधीजींच्या विचारांचा अभ्यास करून ते दैनंदिन जीवनात आत्मसात करण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळावी, हा या उपक्रमाचा खरा उद्देश होता. या परीक्षेचे नियोजन व आयोजन सैय्यद शोएब यांनी केले. तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवृंद यांनी मोलाचे सहकार्य केले.

जाहीर नोटीस

